नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०७/२०२५ (शुक्रवार)**

---

## बुटीबोरी येथे महीलांची छेड काढणाऱ्या अज्ञात आरोपीचा तात्काळ घेतला शोध बोरी पोलीसांची कामगिरी

दिनांक ०२/०७/२०२५ रोजी सकाळी ०६:३० वाजता दोन महीला या बुटीबोरी येथील दत्ता मेघे रिक्रीएशन सेंटर समोरील गल्लीतुन मॉर्निंग वॉक करीत असतांना त्यावेळी एक अज्ञात अंदाजे २० वर्षाचा तरूण मोटर सायकलने तेथे आला आणि तो त्या महीलांसमोर उभा होवुन स्वत:चे कपडे काढुन त्यांचे गुप्तांग दाखवु लागला. त्यावेळी त्या महीला घाबरल्या आणि तेथुन पळुन गेल्या. त्यानंतर आज दिनांक ०४/०७/२०२५ रोजी सकाळी ०६:३० वाजता दरम्यान सुध्दा नमुद महीलांना तो अज्ञात तरूण स्वत:चे कपडे काढुन त्यांचे गुप्तांग दाखवु लागला. अशा प्रकारची तक्रार घेवुन काही महीला बोरी पोलीस स्टेशन येथे पोहचल्या असता तात्काळ पोलीसांनी महीलांकडे मोबाईल मध्ये असलेल्या फोटोवरून आरोपीचा शोध सुरू केला. नमुद आरोपी हा महावीर किरणा दुकानात आल्याबाबत माहीती पोलसांनी मिळाली. पोलीसांनी तात्काळ सी.सी.टी.व्ही फुटेज मधुन त्याचा स्पष्ट फोटो घेवुन, गुप्त बातमीदारांच्या मदतीने शोध घेवुन आरोपी **नामे निषाद औरंगजेब खान, वय १९ वर्षे, रा. सातगाव, तुरकमारी याला ताब्यात घेतले.**

फिर्यादी यांच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम ७८(१),७९,२९६ भा.न्या. सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन नमुद आरोपीला अटकेची प्रक्रीया सुरू आहे.

# मा. श्री. डॉ. दिलीप पाटील—भुजबळ, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र यांनी उदयोजकांची बैठक घेतली आणि जनता दरबार घेतला.

आज दिनांक ०४/०७/२०२५ रोजी मा. श्री. डॉ. दिलीप पाटील — भुजबळ,विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयअंतर्गत बुटीबोरी औद्योगिक क्षेत्राला भेट दिली. सदर भेटी दरम्यान BMA(Butibori Manufacturing Association) येथे मा. श्री. डॉ. दिलीप पाटील — भुजबळ,विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि ईतर मान्यवारांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच BMA(Butibori Manufacturing Association) येथे उद्योग क्षेत्रातील प्रमुखांची बैठक घेवुन संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या तसेच त्यांना सीसीटीव्ही बसवणे, औद्योगिक सुरक्षा, वाहतूक समस्या इत्यादीं बाबत चर्चा करून सुचना दिल्या. BMA कडुन पोलिस विभागाने केलेल्या चांगल्या कामाबद्दल पोलिस विभागाचा सत्कार करण्यात आला. सदर बैठकीला BMA(Butibori Manufacturing Association)चे पदाधिकारी देखील उपस्थित होते.

त्यांनतर मा. श्री. डॉ. दिलीप पाटील — भुजबळ,विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र यांनी नागपुर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि प्रतिष्ठीत नागरिक यांचा जनता दरबार घेवुन आगामी सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाला मा. श्री. डॉ. दिलीप पाटील—भुजबळ,विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, यांच्यासह श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग हे उपस्थित होते.




ASSOCIATION




BUTIBORI MANUFACTURERS ASSOCIATION

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०३/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०४/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत अण्णाभाऊ साठे नगर, पेठ बुधवार, काळे चौक, सावरगाव रोड येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री बापु रोहोम यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच गळपुरा चौक येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस स्टेशन काटोल चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.










39 J 6320

## सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर आणि पोलीस स्टेशन खापा येथे घेण्यात आली शाळा, महाविद्यालय व ट्युशन क्लासेस मधील वाहतूक नियोजन समितीचे सदस्यांची बैठक

दिनांक ०४/०७/२०२५ रोजी सावनेर उपविभागातील सावनेर आणि खापा पोलीस स्टेशनला त्यांच्या हद्दीतील शाळा, महाविद्यालय व ट्युशन क्लासेस मधील वाहतूक नियोजन समितीचे सदस्यांची बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये उपस्थितांना शासनाने विद्‌यार्थ्यांच्या वाहतुकी संबंधात जारी केलेल्या नियमांची माहिती देऊन पूर्तता करण्यासंबंधी, तसेच त्यांच्या वाहनामधील विदयार्थ्यांसोबत योग्य वर्तवणुकी बाबत आणि शिक्षकांना ट्युशन क्लासेस मधे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सदर बैठकीमध्ये शिक्षक, स्कुल बस चालक वाहक व आटो चालक असे हजर होते. पोलीस स्टेशन सावनेर येथे पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांनी तसेच पोलीस स्टेशन खापा येथे सपोनि श्री. किशोर भुजाडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून सुचना दिल्या.






REDMI NOTE 13 PRO+ 5G
04/07/2025 18:08


REDMI NOTE 13 PRO+ 5G
04/07/2025 18:08

# प्राणांतिक अपघात

पोस्टे देवलापार अंतर्गत मौजा चोरबाहुली शिवार येथे दि. १७/११/२०२४ चे १६.०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे कालु उर्फ रामरतन, वय ५० वर्षे, रा. चोरखुमारी, ता. रामटेक** हे गुरे ढोरे चारीत असताना ट्रक क्र एम एच ४० सी एम ९७६५ चा चालक आरोपी नामे नशीम हमीद खान, वय ३६ वर्ष, रा. गणेशगंज, जि. शिवनी, राज्य मध्यप्रदेश,त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून मृतकास जोरदार धडक मारल्याने मृतकाचा मृत्यृ झाला. सदर अपघातात आरोपीचा ट्रक पलटी झाल्याने आरोपी स्वत: आणि त्याच्या ट्रक मधील क्लिनर सुध्दा जखमी झाले.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन देवलापार येथे आरोपी ट्रक क्रमांक एम. एच. ४० सी. एम. ९७६५ चा चालक नामे नशीम हमीद खान, वय ३६ वर्ष, रा. गणेशगंज, जि. शिवनी, राज्य मध्यप्रदेश याच्या विरूद्ध कलम २८१, १२५(अं), १०६(१), ३२५ भा.न्या.सं सह कलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**